# महाराष्ट्रातील शिक्षण बदलते आहे

महाराष्ट्रात, आज, प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात, आणि त्यातही शेकडो जिल्हा परिषद शाळांमधून, एक नवी चळवळ सुरु झाली आहे. ज्ञानरचनावादी अथवा रचनावादी शिक्षणपद्धतीच्या प्राथमिक शाळांच्या स्तरावरील अंमलबजावणीची, ही चळवळ आहे. रचनावादी शिक्षणपद्धतीचा स्वीकार, वापर, प्रसार आणि प्रचार या साऱ्या अंगांनी, एकाच वेळी सुरू झालेली ही चळवळ आहे. तळागाळातून, अनेक खेड्यांमधील पहिली दुसरीच्या वर्गांमधून ती प्रत्ययाला येऊ लागली आहे; आणि कासच्या पठारावरील एकापाठोपाठ एक अशा बहरणाऱ्या फुलांसारखी, ती, महाराष्ट्राच्या शिक्षणपठारावर पसरत चालली आहे.

रचनावादी पद्धती म्हणजे, मुलांना, त्यांच्या शिकण्याच्या नैसर्गिक पद्धतीला अनुसरून, शिकण्याची संधी देणारी पद्धती. मुलांना शिकण्याची क्षमता आणि प्रेरणा उपजतच असते, मुलांचे आपणहून होणारे शिकणे हे आनंदात होत असते. काहीतरी करत करत, स्वतःचे शरीर व मन गुंतवत गुंतवत शिकत जाणे, ही मेंदूची सातत्यपूर्ण शिक्षणाची रीत असते; अशा काही शास्त्रशुद्ध गृहितांवर आधारलेली अशी ही शिक्षणपद्धती आहे.

ज्या शालेय वर्गांमधून अशी पद्धती सुरू होते तेथे, शिक्षकांनी शिकविण्याचे प्रमाण कमी होत जाऊन मुलांनी स्वतःहून शिकण्याचे प्रमाण वाढत जाते. कुणीतरी सांगून, लादून, शिक्षेचे भय दाखवून, बक्षिसांची लालूच दाखवून शिकण्यापेक्षा आपणहून, मुक्त मनाने, एकाग्र होऊन, मस्त मजेने शिकणे याला, अलीकडच्या आकलनशास्त्राचा आधार आहे. रचनावादी शिक्षणाच्या वर्गातील व्यवस्थाही वेगळी असते. येथे विद्यार्थी तासनतास बाकांवर एकमेकांना खेटून, पायांत बूट-मोजे घालून, एकाच दिशेने पाहत, ओळींत बसत नाहीत, शरीरबंद अवस्थेत दिवसभर राहत नाहीत तर, ते येथे जमिनीवर, छोट्याछोट्या गटांमध्ये, एकमेकांच्या समोर बसून, एकमेकांच्या समवेत, एकमेकांच्या सहाय्याने शिकतात. इथे विद्यार्थी शरीर सैल अवस्थेत व मन मुक्तपणे एकमेकांशी, शिक्षकांशी, संवाद करतात, एकमेकांशी बोलतात, इकडून तिकडे जा - ये करतात, आणि हे सारे करता करता शिकतात. पारंपरिक बंदिस्त शिक्षणव्यवहारांपेक्षा, रचनावादी मनमोकळा शिक्षणव्यवहार हा शिकण्याचा अत्यंत प्रभावी मार्ग आहे, हे अलीकडच्या मेंदूशास्त्राने दिलेले ज्ञान आहे.

या शिक्षणक्रांतीशी संबधित अशा काही घटनांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे .एक म्हणजे, अलीकडेच शिक्षणहक्क कायद्याने,मुलांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी दिलेली आहे; आणि त्याची पूर्ती करणे हे आपले कर्तव्य आहे.

दुसरी घटना वास्तव परिस्थितीची निदर्शक आहे.२००४ ते २०१४ या दहा वर्षांतील 'असर' अहवालांच्या आधारे तयार केलेला दिशादर्शक अहवाल गेल्या वर्षी प्रसिद्ध झाला असून, त्यात, महाराष्ट्रात, गेल्या पाच वर्षांत झालेली गुणवत्तेची घसरण निदर्शनास आणली आहे. या अहवालांची आकडेवारी, सर्वेक्षणपद्धत इत्यादींबाबत वेळोवेळी वाद झाले आहेत. तरीही ढोबळमानाने हे असमाधानकारकतेचे चित्र डोळयांसमोर ठेवून ते बदलण्यासाठी पाऊले टाकणे इष्टच ठरेल.

तिसरी घटना आहे ती प्रत्यक्षपणे बदलल्या गेलेल्या शिक्षणव्यवहाराची. सातारा जिल्ह्यात कुमठेबीट, वाई तालुका येथील शे-दीडशे शाळा ह्या रचनात्मक शिक्षणपद्धतीचा अवलंब करून, मुले कशी छान शिकतात याचा वस्तुपाठ देणाऱ्या शाळा ठरल्या आहेत. ग्राममंगल संस्थेच्या आदिती नातू यांनी प्रयत्नपूर्वक निर्माण केलेला प्रत्यक्षातील पूर्ण शाळेचा वाई येथील नमुना, आणि सत्तर-ऐंशी शिक्षकांचे केलेले प्रशिक्षण, विस्तार अधिकारी श्रीमती भराडे यांची कल्पक दूरदृष्टी, वाईचे गटशिक्षणाधिकारी श्री. जाधव यांचे नेतृत्व आणि नव्या उमेदीने प्रेरित झालेले शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नांतून रचनात्मक शिक्षणाचे, सर्व मुलांना यशस्वी करणारे, पर्व सुरू झाले आहे. सर्व मुले शिकू शकतात, बहुतेक मुले असलेला सर्व अभ्यास आत्मसात करू शकतात, तर काही मुले पुढच्या इयत्तेतील अभ्यासालाही भिडतात. वर्गात 'अप्रगत' कुणीही असत नाही; या साऱ्यांचा प्रत्यय या शाळांमधून आला आहे.

रचनावादी शिक्षणाचे हे व्यवहारिक यश आत्ताचे शिक्षणमंत्री महोदय श्री. विनोद तावडे व शिक्षणतज्ञ प्रधान शिक्षणसचिव श्री नंदकुमार यांनी नेमकेपणाने हेरले आणि ही यशोगाथा संपूर्ण महाराष्ट्रासाठी लिहिण्याचा दीर्घकालीन निर्णय घेतला.

शासनाने, २२ जून २०१५ रोजी एक सविस्तर 'शासन निर्णय' प्रसिद्ध करून, महाराष्ट्रभर रचनावादी शिक्षणप्रसाराची नांदी केली. हा शासनानिर्णयच मुळी शिक्षकवर्ग व अधिकारी वर्ग यांना प्रेरित करणारा व रचनावादी शिक्षणाचे नवे आव्हान घेण्यास प्रवृत्त करणारा आहे.या शासननिर्णयाची दोन वैशिष्ट्ये लक्षात घेण्यासारखी आहेत.एक, पुढील तीन वर्षांसाठी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीची नेमकी (संख्यात्मक) उद्दिष्टे ठरवून दिली आहेत, आणि ती गाठण्याचा आटोकाट प्रयत्न शिक्षक व अधिकारी करतील, असा विश्वास त्यांच्यावर टाकला आहे. दुसरे वैशिष्ट असे की, आजवर शिक्षकांसाठी होणारी वेगवेगळी प्रशिक्षण रद्द करून (त्यांची सक्ती टाळून) ज्या शिक्षकांना स्वेच्छेने असे वाटते की, आपल्याला रचनावादी पद्धतींचे प्रशिक्षण घ्यायला हवे आहे, त्यांच्या प्रशिक्षणाची सोय शासन उपलब्ध करून देणार आहे.

महाराष्ट्रात खेडोपाडी आपापल्या शाळा रचनावादी पद्धतीने सज्ज होत आहे याचा अंदाज, नुकत्याच पुण्यात भरलेल्या ‘शिक्षणाच्या वारी’त आला. शेकडो शिक्षकांची ज्ञानरचनावादी नावीन्यपूर्ण शैक्षणिक साधने पाहायला आणि समजावून घ्यायला महाराष्ट्रभरचे हजारो शिक्षक जमा झाले होते. एक चैतन्यपूर्ण वातावरण तेथे जाणवत होते.

पारंपरिक वर्तनवादी शिक्षणाकडून रचनावादी शिक्षणाकडे जाणे अशी या शिक्षणक्रांतीची दिशा आहे. प्रत्यक्ष शालेय शिक्षणव्यवहारांच्या संदर्भात, तीन तऱ्हेचे पायाभूत बदल घडून येतात, आणि त्यातून शिकणाऱ्या प्रत्येकच विद्यार्थ्याची गुणवत्ता वेगाने वाढत जाते.

पहिला बदल घडून येतो तो, विद्यार्थ्याच्या भूमिकेत. शिक्षकाकडून आणि फक्त ऐकून शिकण्याऐवजी, विद्यार्थी स्वत:चे स्वत:च शिकायला लागतो. त्यामुळे वर्गातील सारी शिक्षणप्रक्रियाच वेगळे रूप धारण करते. येथे, शिकाविण्याकडून शिकण्याकडे असा बदल होत जातो. परिणामत: विद्यार्थी कृतिशील होतो; त्याला शिकण्यात रस वाढू लागतो, यामुळे तो आपल्या शिकण्याची जबाबदारी घ्यायला सज्ज होतो. शिकण्याच्या बाबतींतले त्याचे परावलंबित्व कमी होते व त्याला शिकण्यात अर्थ वाटू लागतो. आपल्या शिकण्याच्या निसर्गदत्त क्षमतांचा वापर वाढवून विद्यार्थी, शिकायला प्रेरित होतो. अशा बदलत्या बदलांनी तीन शिक्षणविषयक सामाजिक प्रश्नांवरही आघात होतो. विद्यार्थी शाळेत शिकते होतात, म्हणून टिकते होतात आणि यामुळे रोज येतेही होतात.

दुसरा बदल घडून येतो तो शिक्षकाच्या भूमिकेत. रचनात्मक स्वरूपाच्या वर्गांत, मुले रस घेऊन शिकू लागतात या विषयीचा विश्वास शिक्षकाला प्राप्त होतो. साहजिकच, या पद्धतीने विद्यार्थ्याला अधिक संधी पुरवायला शिक्षक स्वत:हून प्रेरित होतो. इथे, विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकही कृतिशील होतो आणि या दिशेने विचारशीलही होतो. अनुभव असा आहे की, मुलांच्या भरभरून शिकण्याची आनंददिशा गवसली की, शिक्षक निर्मितीशील व्हायला लागतो. तो नव्या- नव्या कल्पना लढवतो, नवीन साधने निर्माण करतो, विद्यार्थ्यांना सहाय्य करण्याच्या नव्या क्लृप्त्या, नव्या पद्धती यांचा शोध घेऊ लागतो. शिकविणाऱ्या शिक्षकाकडून शोध घेणाऱ्या शिक्षकात, संशोधकात त्याचे सहजपणे रूपांतर होते.

तिसरा बदल  होतो तो व्यवस्थेत व वातावरणात. रचनात्मक शिक्षणाचा अवलंब करताच पहिला बदल घडून येतो तो वर्गातील बैठकव्यवस्थेत. वर्गातील बाके वर्गाबाहेर जातात; त्याबरोबरच स्थिर, बंदिस्त व्यवस्थाही वर्गाबाहेर जाते. बाकांबरोबरच टाय-मोजे-बूट या अशैक्षणिक नि घातक गोष्टीही हाकलल्या जातात.

वर्गात मुले परस्परांना शिकण्यासाठी सामोरी होऊन, जमिनीवर छोट्या छोट्या गटांमध्ये बसू लागतात व सहकारी पद्धतीने शिकू लागतात. इथे मिळणारी शारीरिक मुक्तता हे मुक्तमनाचे प्रवेशद्वार असते. मोकळ्या मनांनी हलत, हसत, खेळत, बोलत मुले स्वशिक्षणाचा आनंद घेऊ लागतात. रचनात्मक शिक्षणात, वर्गातील भिंती, फळे, कोपरे सारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक व कलात्मक अभिव्यक्तींनी सजतात. वातावरणात एक प्रकारचा खुलेपणा आला की मुले धीट होतात, प्रश्न विचारू लागतात, उत्तरे शोधू लागतात. उत्तरांचे मार्गही त्यांना मिळू लागतात. हालचालक्षम व्यवस्था आणि मनमुक्त वातावरण ही रचनावादी शिक्षणाची आयुधे आहेत.

रचनात्मक शिक्षणाचे कालयोग्य असे पर्व महाराष्ट्रात सुरु झाले आहे. शासन, शिक्षक आणि अनेक सामाजिक संस्था व कार्यकर्ते या कामी एकत्र आले आहेत. उद्योगसंस्था निधी घेऊन पुढे येताहेत. काही कर्मद्वेषी लोक अडथळे निर्माण करण्याचे क्षुद्र प्रयत्न करतीलही, आपण आपली चाल चालतच राहायला हवी. लक्षात असे ठेवू या की, ज्यामुळे मुले चांगली शिकतात तीच शिक्षणपद्धती उत्तम होय!

❖